॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229294

Fax : (02462) 229572

## EXAMINATION DEPARTMENT

Website: srtmun.ac.in

e-mail:directorboee@srtmun.ac.in


संदर्भ :परीक्षा/२०१९-२०/२२७५

दिनांक : १४/०२/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : 'क्यार' व 'महा' चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-याचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र. एडीआर-२०२०/प्र.क्र. ०७/तांशि ६ दि. २१ जानेवारी, २०२०

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने वरील संदर्भाकिंत परिपत्रकान्वये महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ नोव्हेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यामधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतक-यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कला संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परिक्षा शुल्क माफ करण्यात यावे असे कळविले आहे. (शासन परिपत्रक सोबत जोडले आहे.)

सबब, वरील शासन निर्णयानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये अशा बाधित तालुक्यातील शेतक-यांचे पाल्य शिकत असल्यास व सदर विद्यार्थी सदरील शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद सर्व अटींची पुर्तता करीत असल्यास त्याची खातरजमा करुन अशा विद्यार्थ्यांच्या उन्हाळी २०२० परीक्षेसाठीचे परीक्षा शुल्क माफ करण्यात यावेत व अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त करुन या सवलतीसाठी पात्र असल्याबाबतचे सर्व पूरक कागदपत्रे जसे की विद्यार्थ्यांचे रहिवासी प्रमाणपत्र, पालकाचा उत्पन्नाचा दाखला, प्राचार्यांचे प्रमाणपत्र ईत्यादी सह प्रस्ताव सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग नांदेड यांचेकडे दिनांक २९/०२/२०२० पर्यंत अचुक सादर करावा व त्याची एक प्रत परिक्षा विभागास सादर करावी.

तसेच आपणांस असेही कळविण्यात येते की, हिवाळी २०१९ परिक्षेसाठी वरील प्रमाणे पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत मिळणेसाठीचा प्रस्ताव महाविद्यालयांनी वरील प्रमाणे दिनांक २९/०२/२०२० पर्यंत सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांचेकडे सादर करावा व त्याची एक प्रत परिक्षा विभागास देण्यात यावी. जर वरील प्रस्ताव सहसंचालक कार्यालयाने त्रुटीमुळे अमान्य केल्यास अशा महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क परिक्षा विभागामध्ये भरणे बंधनकारक राहिल याची सर्वानी नोंद घ्यावी.

संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत : ०१. मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
०२. मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
०३. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पुणे.
०४. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन
०५. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ,
०६. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ

Examinations
S. R. T. M. University
Inword No....4118.....
Date...06/02/2020....

कुलसचिवांचे कार्यालय
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आवक क्र....10495....
दिनांक 05/02/2020

**"क्यार व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्याचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. एडीआर -२०२०/प्र. क्र. ०७ /तांशि ६**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २१ जानेवारी, २०२०.

<u>संदर्भ</u> : १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक सीएलएस-२०१९/प्र क्र.१९१/म ३, दि.१८ नोव्हेंबर,२०१९.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एससीवाय-११/२०१९/प्र.क्र.८१/म ११, दि.१९ नोव्हेंबर,२०१९.

**परिपत्रक :-**

माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्हंयातील ३२५ तालुक्यामधील शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झाले आहे. सदर आपदग्रस्तांना विशेष दराने मदत देण्याबाबत व विविध सवलती लागू करण्यासंदर्भातील शासन निर्णय महसूल व वन विभागाकडून दि.१८ नोव्हेबर, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.सदर शासन निर्णयान्वये शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्याच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परिक्षा शुल्कात माफीची सवलत देण्यात आली आहे. सदर सवलतीबाबत संबंधित प्रशासकीय विभागाने आवश्यकतेनुसार सविस्तर आदेश निर्गमित करावेत, तसेच त्याबाबत आवश्यक निधीची तरतूद करून ती माफ करण्यात यावी, असे निदेश दिले आहेत. महसूल व वन विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयानुसार कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील कला महाविद्यालयांमधील पात्र विद्यार्थ्यांना "परिक्षा शुल्क माफी "सवलतीचा लाभ देण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश सर्व विद्यापीठांना तसेच कला संचालनालयास देण्यात येत आहेत: -

१. महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ नोव्हेंबर,२०१९च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्हंयातील ३२५ तालुक्यामधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतकऱ्यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कला संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परिक्षा शुल्क माफ करण्यात यावे.

Exam

२. या शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यत ज्या विद्यार्थ्यांकडून परिक्षा शुल्क आकारण्यात आले आहे, त्या विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत करण्यात यावे.

३. या सवलतीचा लाभ केवळ आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यापुरता मर्यादित राहिल. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखाली शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ५०% परिक्षा शुल्क शिष्यवृत्तीच्या स्वरूपात देण्यात येत असल्याने या योजनेखाली परिक्षा शुल्काच्या केवळ ५०% इतकी रक्कम माफ करण्यात यावी. तसेच रूपये ८.०० लाख पर्यंत कुटुबांचे वार्षिक उत्पन्न असलेल्या उर्वरित विद्यार्थ्यांना १००% परिक्षा शुल्काची रक्कम माफ करण्यात यावी.

सादर करावे
5/2/2020

४. या योजनेवरील परिक्षा शुल्क माफीसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करून घेण्याची, विद्यार्थ्यास या सवलतीलसाठी पात्र ठरविण्याची आणि त्याप्रमाणे विद्यापीठाकडे /कला संचालनालयाकडे परिक्षा शुल्काची मागणी करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

५. यासाठी होणारा खर्च सर्व संबंधित विद्यापीठांनी तसेच कला संचालनालयाने स्वतःच्या जमा निधीतून भागवावा.

६. हे आदेश स्वायत्त संस्थाना देखील लागू राहतील.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००१२११७२३२५०४०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sandesh Rajaram Utekar

Digitally signed by Sandesh Rajaram Utekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=009789e9fe23fde06096381e43bebecd32b5c692c899745eee7d89d805005a87, cn=Sandesh Rajaram Utekar
Date: 2020.01.22 11:10:06 +05'30'

**(सं. रा. उतेकर)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे

**प्रत,**

१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. सर्व अधिष्ठाता, सर्व शासकीय कला महाविद्यालये.
५. सर्व उपसचिव/कार्यासन क्र विशि-३/तांशि-४/साशि-१ उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
६. महसूल व वन विभाग/सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/आदिवासी विकास विभाग/विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग/कृषि व पदुम विभाग
७. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
८. निवडनस्ती /तांशि ६.